सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: मबाआ-२०१९/प्र.क्र.३१/का-७अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २५ एप्रिल, २०१९.

संदर्भ:- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १ एप्रिल, २०१९.
२) शासन परिपत्रक,महिला व बाल विकास विभाग क्र. बीजीटी- २०१९/प्र.क्र. १४/का-४, दि. १० एप्रिल, २०१८.
३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.मबाआ- २०१८/प्र.क्र. ७२/का-७अ, दि. १७ डिसेंबर,२०१८.
४) शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्र.मबाआ- २०१८/प्र.क्र. ७२/का-७अ, दि. ८ मार्च,२०१९.

प्रस्तावना:

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना सन १९७५-७६ या वर्षापासून राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने दिनांक ८/१२/२०१७ च्या आदेशान्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत वेतन याबाबीकरीता केंद्र व राज्य हिस्साचे प्रमाण २५:७५ असे केले आहे. यापूर्वी वेतन या बाबीकरिता केंद्र व राज्याच्या हिश्याचे प्रमाण अनुक्रमे ६०:४० असे होते. त्याकरिता सदर योजनेतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन केंद्र हिश्यातील ६० टक्के प्रमाणे वेतन २२३६ १९०९ (०१-वेतन) व २२३६ १९७२ (३६-सहा.अनुदाने,वेतन) तर राज्य हिश्यातील ४० टक्केप्रमाणे वेतन २२३६ १९१८ (०१-वेतन) व २२३६ १९८१ (३६-सहा.अनुदाने,वेतन) या लेखाशीर्षामधून अदा करण्यात येत होते. तथापि, आता केंद्र शासनाने वेतन याबाबीकरीता केंद्र व राज्य हिस्साचे प्रमाण २५:७५ असे केले आहे. सदर प्रमाण बदलताना जिल्हा कार्यक्रम अधिकारी, सांख्यिकी सहायक, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका/पर्यवेक्षिका इत्यादी पदांकरिता केंद्र शासनाने २५% प्रमाणे वेतनाकरिता त्यांचा हिस्सा व ७५ % प्रमाणे राज्य हिस्सा असे प्रमाण केले आहे. तर उर्वरीत संवर्गातील पदांकरिता (आयुक्तालयातील सर्व पदे, कार्यालय अधिक्षक, कनिष्ठ लिपिक, वाहन चालक, शिपाई, प्रकल्पातील इतर पदे इत्यादी.) केंद्र सरकार वेतनाकरिता निधी देणार नसल्याने आता राज्य शासनास या पदांकरिता वेतन १००% राज्य हिस्स्यातून अदा करणे आवश्यक आहे.

२. सदर बाब दिनांक ५ जून,२०१८ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली होती.त्यास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने बदलेल्या प्रमाणानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन अदा करण्याकरिता नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट निर्माण करण्यास संदर्भाधीन क्रमांक-३ येथील दिनांक १७.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे.

३. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता सदर शासन निर्णयान्वये वेतनाकरिता वरीलप्रमाणे नव्याने उघडण्यात आलेल्या लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामध्ये तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली असून यापुर्वीच्या लेखाशीर्षामध्ये तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आलेली नाही. त्यानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून जुन्या लेखाशीर्षामधून वेतन आहरित न करता वरीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामधून वेतन आहरित करण्याच्या सूचना संदर्भाधीन क्रमांक-४ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

४. केंद्र शासनाने सन २०१९-२० या वर्षाकरिता वेतनाकरिता रु. ३१९.७८ कोटी एवढा APIP मंजूर केला असून त्यापैकी बदलेल्या प्रमाणानुसार केंद्र शासनाने त्यांचा हिस्सा रु. ७९.९४ कोटी एवढा देय केलेला आहे. सन २०१९-२० चा अंतरिम अर्थसंकल्प दिनांक २७ फेब्रुवारी,२०१९ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला. हा अंतरिम अर्थसंकल्प असल्याने अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करुन विनियोजन विधेयक मंजूर होईपर्यतच्या कालावधीसाठीचा (एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या चार महिन्यांचा) खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने “महाराष्ट्र विनियोजन(लेखानुदान) विधेयक,२०१९” मंजूर केले आहे. त्यानुसार माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै, २०१९ या चार महिन्यांकरिता खर्च भागविण्यासाठी वित्त विभागाने परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग, क्र.बीजीटी-२०१९/प्र.क्र.१४/का-४, दिनांक १० एप्रिल, २०१९ सोबतच्या परिशिष्टानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै, २०१९ या चार महिन्यांकरिता खर्च भागविण्यासाठी लेखानुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुषंगाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनाकरिता संदर्भाधीन क्रमांक-३ येथील दिनांक १७.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नव्याने निर्माण करण्यात आलेल्या लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामधून मंजूर लेखानुदानानुसार निधी वितरित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्रमांक-एक्स-१ मुख्य लेखाशिर्ष २२३६- पोषण आहार अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनाकरिता माहे एप्रिल, २०१९ ते माहे जुलै,२०१९ पर्यतंच्या चार महिन्याचा खर्च भागविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या लेखानुदानानुसार व केंद्र शासनाच्या सुधारित मागदर्शक सुचना तसेच वित्त विभागाच्या दिनांक १.४.२०१९ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार संबधित लेखाशीर्षाखाली सदर शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामधील स्तंभ क्र-८ मध्ये नमूद केल्यानुसार निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे राहतील त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-१ येथील दिनांक १.४.२०१९ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या तपासणी सूचीतील बाबींची, केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनांचे तसेच यासंदर्भात नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन यांचे काटेकोर पालन करावे.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १.४.२०१९ च्या परिपत्रकामधील तरतुदीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०४२५११२३४९१२३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.04.26 15:01:46 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
२) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
३) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (आयुक्तालय,ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई मार्फत)
५) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद (आयुक्तालय,ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई मार्फत)
६) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास(आयुक्तालय,ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई मार्फत)
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (आयुक्तालय,ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई मार्फत)
९) सर्व तालुका कोषागार अधिकारी (आयुक्तालय,ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई मार्फत)
१०) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, (आयुक्तालय,ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई मार्फत)
११) कार्यासन(व्यय-६/अर्थसंकल्प-७) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) कक्ष अधिकारी(का.४), महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१३) निवड नस्ती-का-७ अ

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मबाआ-२०१९/प्र.क्र.३१/का-७ अ,
दिनांक - २५ एप्रिल, २०१९ सोबतचे विवरणपत्र

(रु. लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	उद्दीष्ट	केंद्र शासनाने वेतनाकरिता मंजूर केलेला APIP	केंद्र शासनाने देय केलेला त्यांचा हिस्सा	सन २०१९-२० अर्थसंकल्पिय अंदाज	मंजूर लेखानुदान	वितरीत करावयाचा निधी
१	२	३	४	५	६	७	८
१	२२३६ २१३७ (केंद्र हिस्सा २५ %)	०१-वेतन	३१९७८.२०	७९९४.५५	१०१२	५००	५००
२	२२३६ २१४६ (राज्य हिस्सा ७५ %)	०१-वेतन			३०३६	१५००	१५००
३	२२३६ २१५५ (केंद्र हिस्सा २५ %)	३६-सहा.अनुदाने (वेतन)			२५०७	१४००	१४००
४	२२३६ २१६४ (राज्य हिस्सा ७५ %)	३६-सहा.अनुदाने (वेतन)			७५२१	४२००	४२००
५	२२३६ २१७३ (अतिरिक्त राज्य हिस्सा १०० %)	३६-सहा.अनुदाने (वेतन)			४४३८.९२	११००	११००
६	२२३६ १९४५ (अतिरिक्त राज्य हिस्सा १०० टक्के)	०१-वेतन			११०१.९६	२७५	२७५

(ला.रा.गुजर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन